MAH/NAN/10936/2015
ISSN :2454-7905
SJF 2023 Impact Factor : 8.024

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal




(A Peer Reviewed) Vol. 2- ISSUE- LXXVI, 11 Feb 2023

## साहित्य समीक्षा व मराठी साहित्य

संपादक - प्रा. डॉ. प्रशांत भंडे

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | **साहित्य समीक्षा व मराठी साहित्य** - डॉ. नम्रता बागडे | १० |
| २. | **समीक्षा संकल्पना आणि स्वरुप** - संगीता सोमवंशी | १५ |
| ३. | **साहित्य समीक्षा : संकल्पना व प्रकार** - राजीव के.आरके. | १८ |
| ४. | **साहित्य मानससंबंधांचा व्यूह सिद्ध करणारी समीक्षा** - डॉ. अंकुशकुमार चव्हाण | २३ |
| ५. | **मराठी साहित्यातील मार्क्सवादी संकल्पना** - प्रा. मारोती गोविंदराव गायकवाड | २६ |
| ६. | **मराठी समीक्षेत समीक्षकांचे योगदान** - प्रा. डॉ. संजीवकुमार सूर्यकांत पांचाळ | ३० |
| ७. | **समीक्षा प्रक्रिया** - डॉ. अक्षय किशोर घोरपडे | ३४ |
| ८. | **मराठीतील मार्क्सवादी साहित्य विचार** - डॉ.अशोक नारनवरे | ३७ |
| ९. | **एकविसाव्या शतकातील स्त्री समीक्षकांचे योगदान** - प्रा.उषा सिताराम पाटील | ४१ |
| १०. | **१९७० च्या दशकातील दलित स्वकथनाचे स्वरूप** - प्रा. डॉ. सुरेश व्यंकटराव कदम | ४५ |
| ११. | **'दलित साहित्या'च्या नामांतरामागील प्रयोजने आणि त्याची प्रस्तुतता** - डॉ. अश्विनी आत्माराम तोरणे | ५० |
| १२. | **'ग्रामीण साहित्य : संकल्पना व स्वरूप'** - प्रा. सुरेश लक्ष्मण नजन | ५६ |
| १३. | **विविध वाङ्मय प्रवाहाचे विवेचन : ग्रामीण साहित्य** - गीता किसन इंगळे | ६१ |
| १४. | **ना. धों. महानोराच्या कवितेतील कृषि तथा निसर्गप्रतिमांचे अनेकविध रुप** - प्रा.डॉ.बालाजी गणपतराव भंडारे | ६६ |
| १५. | **स्त्रीवाद** - डॉ. उज्ज्वला यशवंत सामंत | ७० |
| १६. | **स्त्रीवाद आणि स्त्रीवादी साहित्य** - सौ. माया नितिन पठाडे | ७४ |
| १७. | **स्त्रीवादी चळवळ आणि साहित्य** - प्रा. उज्ज्वला भोर | ७७ |
| १८. | **स्त्रीवाद : संकल्पना, स्वरुप व भारतीय स्त्रीवादाची परंपरा** - प्रा. डॉ जगताप यु. एस. | ८२ |
| १९. | **आदिवासी साहित्य : व्याख्या, स्वरुप व संकल्पना** - डॉ. शर्मिला बाळासाहेब घाटगे | ८५ |
| २०. | **आदिवासी मावचीतील मौखिक संवाद (म्हणी व वाक्प्रचार)** - गावित लता कथ्थू | ८८ |
| २१. | **सातपुड्यातील आदिवासी तडवीची लग्नगीते** - मुकेश एकनाथ सावळे | ९२ |
| २२. | **आदिवासी कवी : देवेंद्र वसावे** - डॉ. सुभाष सदाशिव पुलावळे | ९६ |
| २३. | **देशीवाद आणि मराठी आदिवासी कविता** - डॉ. संजय रमेश मेस्त्री | १०१ |
| २४. | **मुस्लीम मराठी साहित्य चळवळ एक शोध** - प्रा. डॉ. युवराज देवबा भामरे | १०६ |
| २५. | **पुनर्निर्मितीचा साक्षात्कार घडविणारे 'काव्यातील पांडित्य'** - प्रा. डॉ. कैलास सलादे | १०९ |
| २६. | **कवी अजय कांडर यांच्या 'बाया पाण्याशीच बोलतात' या कवितेची समीक्षात्मक मांडणी** - सहा. प्रा. सौ संजीवनी सुरेश पाटील | ११२ |
| २७. | **माणूस असण्याच्या नोंदी : व्यवस्थेला प्रश्न विचारणारी कविता** - शरद ठाकर | ११८ |
| २८. | **बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेतील ग्रामीण स्त्री जीवन** - प्रा. डॉ. मदकुंटे पी.एम. | १२० |

# ६. मराठी साहित्यातील मार्क्सवादी संकल्पना

प्रा. मारोती गोविंदराव गायकवाड,
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
शिवनेरी महाविद्यालय, शिरूर अनंतपाळ, जि.लातूर.

**सारांश :**

मराठी साहित्यांत आधुनिक काळात साहित्याचे अनेक प्रवाह व प्रकार आले आहेत. एखादी विचारधारा मराठी साहित्यात रुजली की त्या अनुषंगाने निर्माण होणाऱ्या साहित्याला विशिष्ट नावाने ओळखले जाते.त्या साहित्याला विशिष्ट विचारधारेचे साहित्य म्हणून ओळखले जाते.मराठी भाषेत त्याची अनेक रूपे पहायला मिळतात. जसे, मराठी साहित्यात स्वातंत्र्योत्तर काळात दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य, स्त्रीवादी साहित्य, मार्क्सवादी साहित्य असे वेगवेगळे साहित्यप्रकार मराठीत आले आहेत. जसेकी, दलित साहित्य हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतून आल्यामुळे त्या साहित्याला आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य किंवा आंबेडकरवादी साहित्य असे ओळखले जाते. तसेच कार्ल मार्क्स यांच्या विचारातून निर्माण झालेल्या साहित्याला मार्क्सवादी साहित्य असे म्हणतात. मराठीत असे अनेक साहित्य विषयक वाद आहेत. जसे वास्तववाद, अस्तित्ववाद, मार्क्सवाद, आंबेडकरवाद, संरचनावाद, स्त्रीवाद व देशीवाद अशी विविध वादाच्या अनुषंगाने साहित्य निर्माण झालेले पहावयास मिळते.

**प्रस्तावना :**

मराठी साहित्यात मार्क्सवादी साहित्याची चर्चा ही नेहमीच होत आली आहे.दि .के .बेडेकर, लालजी पेंडसे, शरदचंद्र मुक्तिबोध, काँ. शरद पाटील अशा मार्क्सवादी लेखकांनी मराठी साहित्याचा मार्क्सवादी विचारधारेच्या अनुषंगाने साहित्य निर्मिती करण्याचा प्रयत्न केला आहे. मार्क्सवादी विचारधारा ही जागतिक तत्त्वेता कार्ल मार्क्स यांच्या विचारातून निर्माण झाली आहे. कार्ल मार्क्सने भांडवलशाहीला विरोध म्हणून कामगार यांच्या बाजूने जी विचारधारा निर्माण केली ती विचारधारा शोषक व शोषण यांच्या तुलनात्मक विचारधारेत पहायला मिळतो. कामगारांचे शोषण थांबले पाहिजे हा मानवतावादी दृष्टीकोन कार्ल मार्क्स विचारातून निर्माण झाला आहे.पाश्चात्य देशात भांडवलदाराकडून कामगारांचे शोषण मोठ्या प्रमाणावर होत होते आणि त्या शोषणाविरुद्धचा लढा मार्क्सने उभा केला होता. कार्ल मार्क्स बरोबर हेगेल या विचारवंतानेही श्रमाचे मूल्य मिळाले पाहिजे असे म्हणून भांडवलदाराच्या विरोधात प्रयत्न केले. भांडवल व श्रम यातले द्वंद्व नष्ट करायचे असेल तर, भांडवलशाहीला नष्ट करून कामगाराची राजकीय सत्ता आवश्यक आहे असे कार्ल मार्क्सला वाटायचे. म्हणूनच कार्ल मार्क्सने भांडवलशाहीला विरोध करून साम्यवादी समाज सत्ता व राजसत्ता निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातूनच ही मार्क्सवादी विचारधारा जगभर जपली गेली आहे. मार्क्सवादाशिवाय जगातले आर्थिक विषमता संपू शकत नाही असे कामगार व मार्क्सवादी विचारवंत व साहित्यिक यांना वाटायला लागले. पुरातन काळापासून जगात मानव समाजाचा इतिहास हा असाच आहे कारण मानवी समाजात एक शोषक वर्ग आहे आणि तो वर्ग इतरांचे शोषण करत असतो. त्याच पद्धतीने आधुनिक काळात औद्योगिकरणानंतर भांडवलशाही निर्माण झाली. त्यातूनच हे भांडवलदार श्रमिक व कामगाराचे शोषण करायला लागले आणि हा भांडवलदाराच्या विरोधातला एक वर्ग तयार झाला. तो म्हणजे फक्त मार्क्सवादी विचारधारा होय मार्क्सवाद हा कार्ल मार्क्स यांनी लिहिलेल्या 'दास कॅपिटल' या ग्रंथातून मांडलेल्या विचारावर आधारित आहे. या ग्रंथात श्रमिक व भांडवलदार याविषयी सविस्तर चर्चा केली. त्यामध्ये श्रमिकांची समाज सत्ता अस्तित्वात येण्यासाठी मार्क्सने आपला विचार या ग्रंथात मांडला आहे.

**शोधनिबंधाचे उद्देश :**

१. मराठी साहित्यातील मार्क्सवादी विचारधारेचे विश्लेषण करणे.
२. मराठी साहित्यावर मार्क्सवादी विचारधारेचा प्रभाव अभ्यासणे.
३. मराठी साहित्यातील मार्क्सवादाचे चिकित्सक विश्लेषण करणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी संशोधकाने विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. विविध प्रकारचे दुय्यम स्त्रोत यामधून मिळालेल्या माहितीच्या आधारे तथ्य संकलन करून त्याचे चिकित्सक विश्लेषण केले आहे.

औद्योगिक क्रांतीमुळे भारतात सुद्धा भांडवलदार निर्माण झाले होते. त्यामुळे साहजिकच भारतातील कामगारांनी कार्ल मार्क्सचा विचार स्वीकारला होता. कारण श्रमिकांची शोषण थांबवायचे असेल तर साम्यवादी विचारधारा स्वीकारावीच लागेल असे कामगारांना वाटायला लागले. हाच विचार मराठी साहित्यात मार्क्सवादी विचारवंताने मांडण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे.मराठी साहित्यात कार्ल मार्क्सची विचारधारा मराठी साहित्यिक व विचारवंतांनी मांडताना या देशात मनूनिर्मित जशी वर्णव्यवस्था आहे तशीच औद्योगिकरणानंतर या देशात वर्ग व्यवस्था निर्माण झाली होती त्यामुळे भांडवलदार कामगाराची शोषण करत होते. हे शोषण थांबवायचे असेल तर मार्क्सवादाच्या विचाराशिवाय पर्याय नाही म्हणून मार्क्सवादी विचारवंताने मराठी साहित्य रचना एक विशिष्ट विचारधारा म्हणून त्याच्याकडे पाहिले आहे.

मार्क्सवादी साहित्य विचार हा स्वतंत्र, स्वयंभू, स्वयंप्रकाशित अथवा आत्मकेंद्रीय, आत्ममलीन साहित्य विचार नाही तर मार्क्सवादी जीवनदृष्टीचे ते एक अविभाज्य अंग आहे.कार्ल मार्क्सने वर्ग जाणीवेने मुक्ती लढ्याकडे डोळस दृष्टीने पाहण्याची आणि प्रबळ वर्ग जाणिवाच्या संघटित धुरीनत्वाच्या परिवर्तनाच्या लढ्यात अग्रेसर राहण्याची एक सम्यक दृष्टी मानवाला आपल्या विचार पद्धतीतून दिली आहे. हाच विचार मार्क्सवादी साहित्य विचार म्हणून मराठी साहित्यात आलेला पहायला मिळतो. हा मार्क्सवादी विचार मराठी साहित्यात काही मोजक्या विचारवंतांनी मांडले आहेत.

**मार्क्सवाद म्हणजे काय? :**

मार्क्सवाद म्हणजे काय? हे समजून घ्यायचे असेल तर मार्क्सवाद म्हणजे प्रख्यात क्रांतिकारी जागतिक तत्त्वेता व वर्गवादी सिद्धांत मांडणारे रशियन लेखक कार्ल मार्क्स यांची विचारधारा होय. मार्क्सवाद हा शास्त्रीय समाज सत्तावादाचा मुलाधार आहे. मार्क्सवाद हा श्रमिक व कामगार यांचे जीवनाचे कल्याण करणारी विचारधारा आहे. कार्ल मार्क्स व एंजल्स यांच्या शिकवणुकीप्रमाणे भांडवलशाही व साम्राज्यशाही यांना संपवायचे असेल तर कामगाराचा एकजुटीचा समाज सत्तावाद आला पाहिजे. कार्ल मार्क्स म्हणतो, कोणत्याही क्षेत्रात स्वतःच्या अस्तित्वाच्या जुन्या स्वरूपाचा नाश केल्याखेरीज विकास होणे शक्य नसते एवढेच नाही तर सामाजिक आणि राजकीय बौद्धिक जीवन क्रियेचा सर्वसामान्य स्वरूप हे शेवटी भौतिक जीवनातील उत्पादनावरूनच ठरते.

**कार्ल मार्क्सचा साम्यवादाचा सिद्धांत :**

साम्यवादी सिद्धांत तत्वनिष्ठ तत्त्वज्ञान नसून जीवननिष्ठ विचार सूत्र आहे. त्यामुळे शोषणमुक्त,वर्ग विहिन समाज निर्मिती हे ते सापेक्षतेने अंतिम ध्येय मानते.म्हणजे शोषणमुक्त वर्ग या अवस्थेला ते जीवनाच्या किंवा साहित्याच्या दृष्टीने अंतिम मानत नाहीत. तशी अवस्था आली की मुक्ती झाली असे ते मानत नाहीत तर त्या अवस्थेत एका नव्या संघर्षाला आरंभ होतो. मानव विरोध निसर्ग हा संघर्ष मनातील जुन्या जाणिवाविरुद्ध नव्या जाणीवा हा संघर्ष किंवा तेव्हा ती अवस्था आणखी जाणवील त्या अज्ञात संघर्ष असे मार्क्सवादी समीक्षक अर्नेस्ट फिशर यांनी साहित्याच्या संदर्भात मांडणी केली आहे. मराठी साहित्यात याच विचाराच्या अनुषंगाने स्वातंत्रपूर्व आणि स्वातंर्त्योत्तर काळात शोषणाच्या अनुषंगाने शोकांतिका होतील असे विचार मराठी मार्क्सवादी समीक्षक दि. के.बेडेकर यांनी केले आहे.

कार्ल मार्क्सच्या साम्यवादाचा सिद्धांत हा जगातील कष्टकरी सामान्य मजुराचे शोषण हे भांडवलदाराकडून थांबले पाहिजे एवढेच जाणवते. शोषण थांबवण्यासाठी उपाय सांगितला की,एका मजूर वर्गाच्या हालअपेष्टा आणि दारिद्र्य नष्ट करण्यासाठी खाजगी मालमत्ता नष्ट करणे आवश्यक आहे. कोणाजवळही खाजगी मालमत्ता असता कामा नये. कारण कामगाराचे उत्पन्न केलेल्या वरकड मूल्याचा उपयोग किंवा दुरुपयोग अथवा अपहार खाजगी मालक करतो म्हणून कार्ल मार्क्स यांनी म्हटले आहे की, मजूरदाराचे, श्रमिकाचे शोषण थांबून इथे राज्य सत्ता (स्टेट) हेच केवळ मालक असते म्हणूनच कामगार वर्गाची अथवा मजूर वर्गाची हुकूमशाही असलीच पाहिजे. असा सिद्धांत कार्लमार्क्सने प्रस्थापित केला तीच विचारधारा शोषित वर्गाचे शासन असले पाहिजे. शोषक वर्गाचे नवे मजूर वर्गाच्या हुकूमशाहीचा हाच अर्थ आहे. म्हणून १९ व्या शतकात औद्योगिकरणानंतर जगभर भांडवलदार निर्माण झाले त्या भांडवलदाराच्या विरोधात श्रमिक व कामगार यांचे नियमन करणारा विचार म्हणजे कार्ल मार्क्सचा साम्यवादी विचार होय.

मराठी साहित्यात कार्ल मार्क्सची प्रेरणा घेऊन आधुनिक काळात अनेक कवी, साहित्यिकांनी आपल्या साहित्यकृती निर्माण केले आहेत. आधुनिक कवींनी व साहित्यिकांनी मार्क्सवादाच्या अनुषंगाने कविता लिहिल्या आहेत. मार्क्सवादाच्या अनुषंगाने नाटक, चिंतनात्मक लेख व समीक्षात्मक ग्रंथ निर्माण केले आहेत. त्यात दी.के.बेडेकर, नारायण सुर्वे, शरदचंद्र मुक्तिबोध, विंदा करंदीकर, बा.सी. मर्ढेकर, गोदावरी परुळेकर, अण्णाभाऊ साठे , नाना जोग, शरद पाटील, खंडेराव सुळे, सुधारक गायधनी, शाहीर अमर शेख व सदा कऱ्हाडे इत्यादी साहित्यिक, कवी, विचारवंतांनी समीक्षकांनी मराठी साहित्यात मार्क्सवाद या अनुषंगाने लेखन केले आहे.

आधुनिक काळात बा.सी.मर्ढेकरांची कविता ही जागतिक मक्तेदारी भांडवलशाहीच्या दास युगातील कविता आहे. ती जागतिव भांडवलशाहीच्या अरिष्टात सापडलेली कविता आहे. आधुनिक कवी केशवसुताच्या व्यक्ती स्वातंत्र्यदृष्टीत मानवतावादाची क्रांतिकारक मर्ढेकरांच्या व्यक्तिवादी, मानवतावादाची कविता पुढे आले आहे. ज्या काळात भांडवलशाहीने व साम्राज्यवादाने विध्वंसक रूप प्रगट केले : काळात मार्क्सवादी विचाराच्या अनुषंगाने या कवीच्या कवितेने कामगाराच्या शोषणाबद्दल आपले विचार व सर्व नवचिंतन, नव आत्मभान, विचारातून मर्ढेकरांसारख्या कवींनी प्रकट केले आहेत.कवी विंदा करंदीकर यांच्या कवितेतही सामाजिक व राजकीय जाणीव बरोबर विचारधारा प्रकट होत आली आहे. लेखनातून साम्यवादाचा त्रिवेणी अविष्कार पाहायला मिळतो. (एक) मुलतः सामान्य माणसाचे दुः अन्याय पाहून अजाण वयातच करंदीकराचे मन खोल पणे हादरले आहे. (दोन) दुःखाच्या असह्य जाणीवेतुन ते दुःख दूर करण्याचे लागले आहेत आणि यातूनच साम्यवादी विचार त्यांना जवळचा वाटला आहे. (तीन) हा साम्यवादी विचार त्यांना जवळचा वाटला तरी समग्रतेची, विविधतेची जाणीव तीव्र राहिली. अशा पद्धतीने विंदा करंदीकर मराठी कवितेत म्हणतात,

**"...मला दिसतात**
**भविष्याकडे कललेल्या स्वीकारशील जीवनाचे**
**लाल लाल केस क्रांतीच्या वादळाने**
**पुन्हा पुन्हा पिंजरलेले"!**

अशा पद्धतीने कविवर्य विंदा करंदीकर यांच्या कवितेतून स्पष्टपणे साम्यवादी विचारधारा प्रकट झाली आहे. त्याबरोबरच न यासारख्या साहित्यिकांनी तर मार्क्सवादी विचाराचे उघड उघडपणे समर्थन केले आहे. त्यांनी आपल्या कविता साम्यवादी विचार घेऊन र नारायण सुर्वे मार्क्सवादाशिवाय कामगाराचे कल्याण होऊ शकत नाही ही ठाम भूमिका घेऊन लिहितात 'कामगार आहे मी, तळपती त सारस्वतांनो थोडासा गुन्हा करणार आहे'! असा आत्मविश्वास आपल्या कवितेतून ते साम्यवादी विचाराच्या अनुषंगाने मांडला आहे. : यांच्या कार्ल मार्क्स या कवितेची संपूर्ण छाया देवलकराच्या लेनिन या कवितेवर पडली आहे. कारण देवलकरांच्या 'सूर्याला साक्ष लेनीनवरच्या कवितेतील ओळीत वर्णन करतात,

**"हातात ग्रंथ घेऊन गंभीर स्थितप्रज्ञ मूर्ती अभय देत म्हणाली,**
**चालू दे तुझा अभ्यास डोळे आकृतीवर ठरवले,**
**जीव एक वाटला विश्वास दुणावला ओळखलस मला**
**होय फोटो कोरलाय मी हृदयावर तोच तू लेनिनच होईना !"**

या छाया देवलकरांच्या ओळीवरून मराठी साहित्य मार्क्स यांच्याबरोबरच लेनिन सारख्या साम्यवादी विचारवंतावरही मराठी कवि आढळतात. महाराष्ट्रातील मार्क्सवादी विचारवंत कॉम्रेड श्रीनिवास देसाई यांनी 'अनुभवाचे थेंब 'ही त्यांची मौलिक चिंतनिका आहे. मार्क्सवादी विचारधारा मांडताना त्यांनी ते अतिशय चिंतनशील पद्धतीने विचार मांडले आहेत.

मराठी साहित्यात मार्क्सवादी प्रेरणेने अण्णाभाऊंनी स्वतंत्र नाटके रचले आहेत.अण्णाभाऊंनी 'इनामदार' या नाटकातून व चित्रित केली आहे. श्रीमंत-भांडवलदार हा शेतकरी-कामगार यांचे चित्रण करताना त्यांच्यासमोर मार्क्सवादी विचारधारा होती. त्या ि अनुषंगानेच भांडवलदार हा गरीब शेतकऱ्यांचे शोषण करतो हे त्यांनी आपल्या नाटकातून साम्यवादी विचारधारा समोर ठेवूनच त्याच आहे. "उद्ध्वस्त धर्मशाळा" या नाटकातून देखील साम्यवादी विचारधाराच प्रगट केली आहे. हे नाटक मार्क्सवादी चळवळीतील अशा घडविते. मार्क्सवादी आणि कम्युनिस्ट चळवळीवर प्रेम करणारा माणूस प्रसंगी त्या चळवळीवर रागावू शकतो हे या नाटकातून दिस कामगाराचे विजय मुख आहे असे सांगणारे नाटक मराठी साहित्यातून आले आहे.

मराठी समीक्षक दि.के. बेडेकर यांनी मार्क्सवादी विचाराच्या अनुषंगाने मराठी साहित्याची चिकित्सा केली आहे. त्यांनी समा विविध समस्यांची सोडवणूक मार्क्सवादी भूमिकेवरून करण्याचा त्यांचा निराग्रही प्रयत्न दिसतो. म्हणूनच दि.के. बेडेकरांनी मार्क्सव दृष्टीने मंडन करणारे चिंतन आपल्या समीक्षाग्रंथातून मांडले आहे. कॉम्रेड शरद पाटील यांनी मराठी साहित्यात मार्क्सवादी समीक्षक म्हणून आपली भूमिका मांडताना त्यांनी भांडवलदाराच्या विरोधात कामगाराच्या बाजूने लेखन करताना मार्क्सवादी विचारधारा म्हण विचाराची प्रभावीपणे मांडणी मराठी साहित्यात अलीकडच्या काळात केलेली पहावयास मिळते.मराठी साहित्यातील मार्क्सवादी विचारा निर्माण झालेले कविता, नाटक,चिंतनात्मक ग्रंथ व समीक्षा विविध अंगाने मराठी साहित्यात ही साम्यवादी विचारधारा आता रूढ झाले

मिळते.

**संदर्भ ग्रंथ :**


१. पाटील शरद, मार्क्सवाद, फुले -आंबेडकरवाद, मावळाई प्रकाशन, पुणे.
२. कऱ्हाडे सदा, मार्क्सवाद, बुद्धवाद आणि आंबेडकरवाद, लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद.
३. जोग वि. स., मार्क्सवाद आणि दलित साहित्य, लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद.
४. कसबे रावसाहेब, आंबेडकर आणि मार्क्स, सुगावा प्रकाशन, पुणे.
५. गाडगीळ स.रा., मराठी कवितेचा मानदंड, खंड दोन, पद्यगंधा प्रकाशन, पुणे.